महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

## आरोग्य विभाग गट क व ड पदभरती २०१६ - अंतिम निवड यादीबाबत

आरोग्य सेवेतील गट क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक ०८.०१.२०१७ व २७.०१.२०१७ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल व गुणवत्तेनुसार निवड याद्या दि. १९.०७.२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्यानुसार दि. १९.०८.२०१७ ते २२.०८.२०१७ या कालावधीत पहिल्या व दि.०८.०२.२०१८ व ०९.०२.२०१८ या कालावधीत दुसऱ्या समुपदेशन फेरीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या दोन फेरीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले होते.

या उपरही अद्याप काही विभागात/जिल्हयात समुपदेशन फेरीस गैरहजर राहिलेले, तसेच प्रमाणपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरलेले व नियुक्ती आदेश दिल्यानंतर विहित मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झालेल्या उमेदवारांच्या जागी गुणवत्ता यादीतील पुढील पात्र उमेदवारांची निवड करून त्यांना प्रमाणपत्र पडताळणी व समुपदेशनाकरीता बोलावण्याची बाब संचालनालयाच्या विचारार्थ होती.

त्यानुसार संवर्गनिहाय तसेच सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय अद्याप रिक्त असलेल्या जागा भरण्याकरीता सर्व पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी सर्व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे पाठविण्यात आली असून त्यांचे स्तरावरून रिक्त जागेच्या प्रमाणात पुढील पात्र उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल व या यादीतील उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणी व समुपदेशनाकरीता दि. ८ जून २०१८ रोजी बोलावण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर समुपदेशन फेरी ही अंतिम फेरी असेल व या नंतर कोणतीही निवड यादी, प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येणार नाही किंवा समुपदेशन फेरीचे आयोजन करण्यात येणार नाही याचीही नोंद घ्यावी. त्यामूळे या फेरीस अनुपस्थित राहण्याऱ्या उमेदवारांचा त्यानंतर विचार करण्यात येणार नाही.

सदर समुपदेशन फेरीकरीता आवश्यक पत्र संबंधित नियुक्ती प्राधिकारी उमेदवारांच्या अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर तसेच इमेल नोंदवला असल्यास त्यावर पाठवतील. तसेच अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर लघु-संदेश पाठवतील.

मा. आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई